## परफॉर्मिंग आर्ट्स क्लब

परफॉर्मिंग आर्ट्स क्लब जो **कलार्पण** या नावाने ओळखला जातो. “कलार्पण”, अर्थात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचा कला उपासक संघ. कलार्पण आपल्या महाविद्यालयात बरेच वर्षांपासून कार्यरत आहे. मागच्या वर्षी पुरुषोत्तम महाकरंडक च्या रूपात कलार्पण ने महाविद्यालयाच्या शिरपेचात मनाचा तूरा रोवला होता,तीच परंपरा कायम ठेवत या वर्षी कलार्पण ने यशस्वी वाटचाल सुरू केलेली आहे, याचाच दाखला , म्हणजे, या वर्षी पुरुषोत्तम करंडक प्राथमिक फेरी,सांभाजीनगर विभागात मिळालेला **रजत पुरुषोत्तम करंडक**. याच सोबत सर्वोत्कृष्ट अभिनय नैपुण्य पुरुष- प्रतिक जंगाले, सर्वोत्कृष्ट विद्यार्थी लेखक- शर्वरी डबीर आणि अभिनय उत्तेजनार्थ-वैष्णवी काळे,हे पारितोषिक ही मिळवले आहेत. यंदाच्या “चुकलं तर माफ करा” या एकांकिकेचा विद्यार्थी दिग्दर्शक प्रतिक जंगाले असून, विद्यार्थी लेखिका शर्वरी डबीर आहे. वैष्णवी काळे, प्रेरणा लिंबोरे,तुळशीराम शिंगारे, सुधन्वा बोर्डे,अभिजीत गणगे, प्रतिक जंगाले , शर्वरी डबीर यांनी एकांकिकेत भूमिका निभावल्या. रिद्धी लकडे,सोहम नाईक,श्रेया देशपांडे,ऋषिकेश पांचाळ, ॲलन साजी,आयुष सिंगतकर ,भाविशा दाशरथे,सुधन्वा बोर्डे व इतर मंडळींनी संगीत दिले. या बरोबरच नैपथ्याची ही विशेष नोंद घेतली गेली,अभिजीत गणगे, अश्विनी बनकर,प्रज्ञा पिंपळे,देवांशी पाटील,ऋषिकेश बनकर, यांनी नैपथ्य केले होते. एकांकिका यशस्वी करण्यामागे,प्रकाशयोजनेचा महत्वाचा वाटा असतो,यंदा वैष्णवी देशमुख,हृषीकेश देशमुख,प्रथमेश धोटे यांनी प्रकाशयोजना केली. ‘**भानगड**’ च्या पावलावर पाऊल टाकत ‘**चुकलं तर माफ करा**’ ने आपला प्रवास सुरू केला आहे.





पुरुषोत्तम करंडक बरोबर च डॉ. बाबासाहेब आबेंडकर मराठवाडा विद्यापीठातील यवुक महोत्सवात ही कलार्पण च्या विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. यामध्ये विविध 36 कलाप्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी त्यांचे गुण दर्शवले.त्यामध्ये चित्रकला, रांगोळी, पोस्टर, मृदमूर्तिकाला, वक्तृत्व, वाद विवाद, काव्यवाचन, लोक/आदिवासी नृत्य, शास्त्रीय गायन, शास्त्रीय तालवाद्य, सुगम गायन इ. चा समावेश होता.अतिशय उत्कृष्ट सादरीकरणाने आपल्या विद्यार्थ्यांनी रसिकांची दाद मिळवली.आपल्या महाविद्यालयाची विद्यार्थिनी भाविशा दाशरथे हिने शास्त्रीय गायनामध्ये दुसरा क्रमांक पटकावला. अभिनेत्री श्रीमती. वर्षा उसगावकर आणि अभिनेता श्री. प्रवीण डाळिंबीकर यांच्या हस्ते बक्षीस वितरण समारंभ पार पडला.





आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांव्यतिरिक्त आपल्या महाविद्यालयातही कलार्पण चा विशेष सहभाग असतो. २२ऑगस्ट २०२३ रोजी सुप्रसिद्ध नृत्यगुरू कथ्थक व ओडीसी सुश्री पार्वती दत्ता यांची नृत्य कार्यशाळा कलार्पण तर्फे आयोजित करण्यात आली होती. ८० मुला - मुलींनी यात उत्साहाने भाग

घेतला, प्रश्न विचारले, शंका उपस्थित केल्या, काही नृत्य मुद्रा शिकण्याचा समजुन घेण्याचा प्रयास केला.

निसर्गातून कशा पद्धतीने संगीताचे सूर शोधल्या गेले, नृत्याची निर्मिती कशी झाली, आपल्या प्राचीन मंदिरांमध्ये ही कला कशी जोपासल्या गेली, तीला प्रोत्साहन मिळाले, शिल्पांमध्ये नृत्य मुद्रा कशा कोरल्या गेले याची अतिशय उद्बोधक अशी माहिती अतिशय रसाळ भाषेत नृत्यगुरू पार्वती दत्ता यांनी मुलांना दिली.







या आणि आशा कार्यशाळांबरोबरच महाविद्यालयातील इतर क्लबस च्या सहयोगाने काम करण्यात कलार्पण चा विशेष भर असतो म्हणूनच , AA GECA, EVOLVE CLUB आणि कलार्पण यांच्या सहयोगाने “उमंग” हा कार्यक्रम ९ सप्टेंबर २०२३ रोजी पार पडला. ह्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना डॉ.श्री. रोहिणीप्रिया दास ह्यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन लाभले.तसेच,अथर्व कुलकर्णी ह्याने डॉ.श्री. रोहिणीप्रिया दास यांची मुलाखत ही घेतली.हा कार्यक्रम गोकुळाष्टमीचे औचित्य साधून घेण्यात

आला. ह्यात कलार्पणच्या विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक सुंदर असे एकल नृत्य, एकल गायन, समूह गायन सादर केले. ह्या सादरिकरणांनी सर्वांना मंत्रमुग्ध केले आणि अध्यात्मिक अशा वातावरणाची निर्मिती झाली.








गोकुळाष्टमी सोबत च गणेश चतुर्थी निमित्य '<u>माझा बाप्पा</u>' ही शाडू मातीने गणेश मूर्ती बनवण्याची कार्यशाळा घेण्यात आली होती . कलार्पण, डिझाईन आर्ट्स अँड क्राफ्ट्स क्लब आणि एन्व्हायर्नमेंट क्लब यांच्या सहयोगाने ही कार्यशाळा घेण्यात आली. ही कार्यशाळा 10 सप्टेंबर 2023 रोजी झाली . सुमारे 150 विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला, मातीचा वापर करून गणपतीच्या मूर्ती तयार करण्यात उत्साहाने गुंतले. परफॉर्मिंग आर्ट्स क्लब आणि डिझाईन आर्ट्स अँड क्राफ्ट्स क्लबच्या प्रीती खोत,देवांशी पाटील, प्रज्ञा पिंपळे या आणि इतर सदस्यांकडून विद्यार्थ्यांना

मार्गदर्शन मिळाले, तर लॉजिस्टिक व्यवस्था आणि कार्यक्रम व्यवस्थापन परफॉर्मिंग आर्ट्स क्लब आणि एन्व्हायर्नमेंट क्लबने कुशलतेने हाताळले.

ही कार्यशाळा, एक स्पर्धा म्हणून आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये सहभागींना त्यांची शिल्पे किमान 3 तासांत पूर्ण करण्याचे आव्हान देण्यात आले होते. सर्वोत्कृष्ट पाच निर्मिती निवडण्यासाठी सर्व शिल्पांची तपासणी केली गेली. डॉ. व्ही. चक्करवार, डॉ. सपकाळ आणि डॉ. एस. कोराणे या तीनही क्लबच्या प्राध्यापक सल्लागारांनी ही तपासणी केली आणि पहिल्या पाच गटांना बक्षिसे देण्यात आली.








फिरोदिया करंडक ही महाराष्ट्रात मानाची समजली जाणारी एकांकिका स्पर्धा आहे,सालाबाद प्रमाणे यंदाही फिरोदिया करंडक २०२४ मध्ये “**रामाय तस्मै नमः**” ही एकांकिका सादर करण्यात आली आणि प्रेक्षकांकडून विशेष दाद मिळाली. महाराष्ट्रातील प्रथम सोळा एकांकीकेतील ही एक एकांकिका आहे.




हे आणि असे अनेक उपक्रम व्हावेत या साठी कलार्पण कायम प्रयत्नशील राहील. विद्यार्थ्यांमधील कलगुणांना प्रोत्साहन मिळवं,त्यांची कला प्रदर्शित करायला त्यांना एक व्यासपीठ मिळावं, हा कलार्पण चा प्रमुख उद्देश आहे. अभियांत्रिकी शिक्षण घेत असतांना,कलाकार जोपासला जावा आणि त्याची कला वृद्धिंगत व्हावी असा कलार्पण चा मानस आहे. हे कार्य कलार्पण मार्फत असेच अविरत चालू राहील.

***“कलार्पण”, अर्थात विविध कलागुणांची,विविध कलाकारांमार्फत झालेली सुरेख गुंफण.***